डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसीलदार, ता.नांदुरा, जि. बुलढाणा यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या कार्यालयामध्ये प्रशासकीय अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्र.सासंवि -१०१८/६९४/प्र.क्र.७८/का.१६
मंत्रालय, मुंबई
दिनांक:- २२ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u>:-१) विधि व न्याय विभाग,शासन निर्णय समक्रमांक दि.२५.०६.२०१८
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे पत्र क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१४६४/२०१९, दि.१९.०७.२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

शासनाच्या संदर्भाधीन क्र.१ दि.२५.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसिलदार, ता.नांदुरा, जि. बुलढाणा यांची श्री साईबाबा संस्थानातील प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली होती. संदर्भाधीन क्र.२ येथील मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या दि.१९.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्या प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस पुढील दोन वर्षे मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने डॉ. आकाश रामहरी किसवे यांच्या प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस पुढील दोन वर्षांकरिता मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा व निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ३९ व ४० आणि सदर नियमांच्या परिशिष्ट-दोन मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि.१७.१२.२०१६ नुसार डॉ. आकाश रामहरी किसवे, नायब तहसिलदार, ता.नांदुरा, जि.बुलढाणा यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानातील “प्रशासकीय अधिकारी” या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस पुढील दोन वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२२१६०७०६३२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Salunke Sunita Parag

Digitally signed by Salunke Sunita Parag
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a9ee0eef2d14d407f36dd3610d7d17b19cc85c5da3c6493dd1b6379b15e3372e, serialNumber=8f3e3dd76ae275cc1afa0c0be4edf609c0420709b30d7478f9b8cff1b4acde7d, cn=Salunke Sunita Parag
Date: 2019.08.22 16:16:44 +05'30'

(सु.प.साळुंके)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, ता.राहता, जि. अहमदनगर

२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३) अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,

४) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

५) मा.राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मुख्य कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, ता.राहता, जि. अहमदनगर

७) डॉ.आकाश रामहरी किसवे, प्रशासकीय अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, ता.राहता, जि. अहमदनगर

८) निवडनस्ती